*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ नुसारच्या (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ अन्वये कलम ११ (१) खालील अधिसूचना.*

## *अधिसूचना*

क्रमांक पीएलए/कावि-८६/२०२१.– ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र. क्र. ७७ (भाग-२)/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड ओ)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी "समुचित शासन" असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनी (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(४)* अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चारखालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार, जिल्हाधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम, १० च्या उप-नियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, पुणे शहर-शिरूर उपविभाग, पुणे यांस पदनिर्देशित करीत आहेत.

### अनुसूची - एक

### जमिनीचे वर्णन

### जिल्हा पुणे, तालुका पुणे शहर, मौजे औंध

| अ. क्र. | सर्व्हे नंबर/ फा. प्लॉट नंबर | नगर भूमापन क्रमांक | अंदाजित क्षेत्र | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | २ | ३ | ४<br>चौ मी. | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | १२५/ब पैकी | ११८६ पैकी | ४८७.०१ | स.नं. १२५-ब (न.भू.क्र. ११८६) पैकी उर्वरित क्षेत्र. | स.नं. १२५-ब (न.भू.क्र. ११८६) पैकी उर्वरित क्षेत्र. | औंध पाषाण शिवेवरील बाणेर रस्ता. | स.नं. १२५-ब (न.भू.क्र. ११८६) पैकी उर्वरित क्षेत्र. |

## अनुसूची - दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव :** हिंजवडी ते शिवाजीनगर, पुणे मेट्रो प्रकल्पाकरिता भूसंपादन.

**प्रकल्पाचे वर्णन** : विशेष सार्वजनिक वाहतुकीचा पायाभूत सुविधा प्रकल्प.

**समाजाला मिळणारे लाभ** : हिंजवडी ते शिवाजीनगर या मार्गावरील सार्वजनिक वाहतूक सुरळीत व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.

## अनुसूची - तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :** बाधित व्यक्ती विस्थापित होत नाहीत.

## अनुसूची - चार

**सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभीकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश** : भूमी संपादन, पुनर्वसन पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) महाराष्ट्र राज्याला लागू असताना (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या कलम १० *(क)* नुसार राज्य शासनाने महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन राजपत्रातील अधिसूचना क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र. ०२/अ-३, दिनांक ११ जून २०२० अन्वये प्रकरण २ व ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

## अनुसूची - पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकांचा तपशील

**(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम** : आवश्यकता नाही.

**(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता** : आवश्यकता नाही.

**(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील** : आवश्यकता नाही.

**टीप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, पुणे शहर-शिरूर यांचे कार्यालय, जुनी जिल्हा परिषद इमारत, तिसरा मजला, पुणे-४११ ००१ येथे निरीक्षण करता येईल.

**डॉ. राजेश देशमुख,**
जिल्हाधिकारी, पुणे.

पुणे, ५ फेब्रुवारी २०२१.

---

## जिल्हादंडाधिकारी यांजकडून

## परिशिष्ट "४"

## विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणुका

**शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्रमांक विकाअ-१११५/प्र. क्र. ८८/५, दिनांक ३१ डिसेंबर २०१५**

**संदर्भ** :(१) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. विकाअ-१७०४/१०९२/प्र. क्र. १८५/२००४/५, दिनांक २ एप्रिल २००५.

(२) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. विकाअ-४१०२/२/प्र. क्र. ३७/२००२/५, दिनांक २१ एप्रिल २००५.

(३) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. विकाअ-२००७/४४०/प्र. क्र. १७४/०७/५, दिनांक २५ जुलै २००७.

(४) शासन सा. प्र. विभाग यांचेकडील शा.नि. क्र. विकाअ-२००७/३६६/०७/५, दिनांक २४ मार्च २००८.

(५) शासन सा. प्र. विभाग शद्धिपत्रक क्रमांक विकाअ-२००७/प्र. क्र. ३८९/५, दिनांक १ ऑगस्ट २००८.

(६) शासन सामान्य प्रशासन विभाग क्रमांक विकाअ-२००८/प्र. क्र. २७६/५, दिनांक २४ जुलै २००८.

(७) शासन सा. प्र. विभागाकडील निर्णय क्रमांक विकाअ-२००६/२९८/प्र. क्र. ६/७/५, दिनांक ७ एप्रिल २००७.

(८) शासन सा. प्र. विभागाकडील पत्र क्रमांक विकाअ-१११७/२७८/प्र. क्र. १११/५, दिनांक ६ सप्टेंबर २०१७.